<u>**दि.०२.०८.२०१४ रोजी मा.मुख्य माहिती आयुक्त यांचेसमवेत सर्व खंडपीठातील माहिती आयुक्त यांची सह्याद्री, अतिथी गृह, मलबार हिल, मुंबई येथे झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**</u>

<u>बैठकीत खालील अधिकारी उपस्थित होते.</u>

**१. श्री. रत्नाकर गायकवाड, मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**२. श्री. ए. के. जैन, राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**३. श्रीमती टी. एफ. थेक्केकरा, राज्य माहिती आयुक्त, कोकण**

**४. श्री. पी. डब्ल्यू पाटील, राज्य माहिती आयुक्त, नाशिक**

**५. श्री. रविंद्र जाधव, राज्य माहिती आयुक्त, पुणे**

**६. श्री. व्ही. डी. पाटील, राज्य माहिती आयुक्त, नागपूर,**

**७. श्री. पी. एस. मीना, अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई**

**८. श्री. भ. बु. गावडे, सचिव, राज्य मुख्य माहिती आयोग**

**९. श्री. सु. ग. सोनावणे, सह सचिव, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई**

**१०. श्री. प्रल्हाद कचरे, अप्पर जिल्हाधिकारी तथा संचालक, माहिती अधिकार केंद्र, यशदा, पुणे.**

**मुद्दा क्र. १ : दि.०५.०४.२०१४ रोजी झालेल्या आयोगाच्या बैठकीचे कार्यवृत्त मंजूर करणे.**

मागील दि. ०५.०४.२०१४ च्य बैठकीचे कार्यवृतावर सविस्तर चर्चा करुन ते मंजूर करण्यात आले.

**मुद्दा क्र. २ : प्रलंबित द्वितीय अपीले व तक्रारींचा आढावा.**

मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी विविध खंडपीठांच्या माहिती आयुक्तांबरोबर चर्चा करुन प्रलंबित द्वितीय अपीले व तक्रारींचा आढावा घेतला. तसेच सर्व खंडपीठांनी प्रत्येक महिन्यात किमान ४०० अपिले सुनावणी घेऊन ती निकाली काढण्याबाबत सूचना दिल्या. जेणेकरुन, जास्तीत जास्त प्रलंबित अपिले/तक्रारी निकाली काढणे शक्य होईल.

**मुद्दा क्र. ३ : विविध खंडपीठांत रिक्त असलेल्या पदांचा आढावा.**

जुलै २०१४ अखेर पर्यंतची सर्व खंडपीठांकडील रिक्त पदांबाबत चर्चा करण्यात आली. याबाबत शासनाकडे पाठपुरावा करुन सदर रिक्त पदे कशी भरता येतील याबाबत सर्व उपस्थित माहिती आयुक्तांबरोबर चर्चा करण्यात आली. सेवा प्रवेश नियमांचा मसुदा श्री. ए. के. जैन, राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी तयार करावा असे ठरले.

**मुद्दा क्र. ४ : व्हिडीओ कॉन्फरन्सींग सुविधा सुरू करणे बाबत.**

बृहन्मुंबई खंडपीठांकडे व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे सुविधा सुरु झाली असून उर्वरित खंडपीठांकडे सदर सुविधा सुरु करण्याबाबतचे काम अंतिम टप्प्यातअसल्याचे सर्व आयुक्तांनी सांगितले. त्यावर व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे सुविधा लवकर सुरु करण्यात यावी व त्यासाठी पाठपुरावा करण्याबाबत मा. मुख्य माहिती आयुक्त यांनी सुचना दिल्या.

**मुद्दा क्र. ५ : अभिलेख नष्ट करणेबाबत.**

अभिलेख नष्ट करण्याबाबत श्री. ए. के. जैन, राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी द्वितीय अपिलाची प्रत व माहिती आयुक्तांचे आदेश असे दोन पेपर स्कॅन करुन ठेवून बाकीचे पेपर्स ताबडतोब नष्ट करणे उचित होईल, असे सांगितले. त्यावर मा. मुख्य माहिती आयुक्त यांनी यास सहमती दर्शवली.

**मुद्दा क्र. ६ : विविध बाबींसाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदी**

सध्या अंदाजपत्रकीय तरतूद पुरेशी आहे. तथापि, सुधारित अंदाजपत्रकीय तरतूद करते वेळी आढावा घ्यावा, असे मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी सांगितले.

**मुद्दा क्र. ७ :** Pursue with Public Authorities compliance of directions u/s १९(८) especially sec ४(१)(a)(b)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८) व ४(१)(a)(b) बाबत आयोगाकडून शासनाकडे वेळोवेळी पत्रव्यवहार करुन पाठपुरावा करण्यात येत असल्याचे मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी सांगितले.

**मुद्दा क्र. ८ :** Upload information regarding penalty etc

मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी अपिल सुनावणी नंतर ज्या आदेशांत शास्ती/शिस्तभंगाची कारवाईची शिफारस केलेली आहे, अशी माहिती सर्व खंडपीठांनी वेबसाईटवर वेळोवेळी अपलोड करण्याबाबत सूचना दिल्या.

**मुद्दा क्र. ९ :** Website- Updating and Corrections, govt. circulars/case laws to be uploaded in pdf format.

या बाबत महाऑनलाईनच्या संबधित अधिका-यांबरोबर वेळोवेळी संपर्क साधून वेब साईट अपडेट कराव्यात, असे मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी सांगितले.

**मुद्दा क्र. १० :-** Paperless office

आयोगाचे ऑफीस पेपरलेस करण्याबाबत एन.आय.सी., मुंबई या कार्यालयाकडे संपर्क करुन प्रत्येक खंडपीठासाठी आय.टी विभागाकडून दोन आय. टी. जाणकार कर्मचारी घेऊन याबाबत पुढील कार्यवाही करावी, असे मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी सांगितले.

**मुद्दा क्र. ११ :** Penalty Monitoring

माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० (१) व २० (२) नुसार आयोगाने दिलेल्या शास्तीबाबत व शिस्तभंगाच्या कारवाईबाबत संबंधित विभांगाकडून वार्षिक अहवालामध्ये माहिती मागवितानाच त्यामध्ये अंतर्भाव करण्यात यावा. तसेच किती प्रकरणांत जन माहिती अधिकाऱ्यांनी ३० दिवसांच्या आत माहिती दिली आहे याचाही विहीत प्रपत्रात अंतर्भाव करावा व सर्व विभागाकडून ही माहिती घेऊन वार्षिक अहवालात याचा अंतर्भाव करावा, असे श्री. ए. के. जैन, आयुक्त, बृहन्मुंबई यांनी सुचविले. त्यावर मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी पुढील अहवालाच्या कार्यवाहीच्या वेळी असे करण्यात यावे, अशा सुचना दिल्या.

**मुद्दा क्र. १२ :** Review pending rti applications on weekly basis .

आयोगात येणा-या माहिती अर्जांवर वेळीच कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे श्री. ए. के. जैन, राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी सांगितले. त्यावर मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी मुख्यालयात यावर तात्काळ कार्यवाही करण्यात येते व सर्व खंडपीठांनी विहित कालावधीत माहिती अर्जांवर कार्यवाही करण्यात यावी, असे सांगितले.

**मुद्दा क्र. १३ :** Sec ४ १( b) ---१७ items--Review updating with concerned compilations on our website

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ १( b) हे आयोगास सुध्दा लागू असून त्याप्रमाणे आयोगाची वेबसाईट नेहमी अपडेट राहील याची काळजी सर्व खंडपीठांनी घेणे आवश्यक आहे, असे मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी सांगितले.

**मुद्दा क्र. १४ :** Dept. action against PIOs- monitoring (Sect २०(२))

सदर मुद्याबाबत मुद्या क्र.११ वरील चर्चेच्या वेळी चर्चा करण्यात आली.

**मुद्दा क्र. १५ :** Six Bundle System to be maintained by each desk

यावर चर्चा झाली नाही.

**मुद्दा क्र. १६ :** Capacity building --Trg of SPIOs, AAs in a cascade model---ATIs to first train Dist Resource Persons

यावर चर्चा झाली नाही.

**मुद्दा क्र. १७ : Digitising office of Benches Commission.**

मुद्दा क्र. १० वर चर्चा करतेवेळी याबाबत पेपरलेस ऑफीस करण्याबाबत चर्चा झाली.

**मुद्दा क्र. १८ :** Pending issues with govt. ---

१) Creation of posts-Inspection wing for each region n HQs& Purchase of car for Pune bench n staff car for inspection wing

पुणे खंडपीठासाठी अमरावती खंडपीठाची कार तात्पुरत्या स्वरुपात तात्काळ पाठविण्यात यावी, असे अमरावती खंडपीठास पत्राद्वारे कळविले असून सदर कार तात्काळ पुणे खंडपीठाकडे पाठविण्यात यावी, असे माहिती आयुक्त, अमरावती यांना मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी सांगितले. तसेच पुणे खंडपीठासाठी नविन कार खरेदीचा जो प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे, त्याचाही पाठपुरावा करण्याच्या सुचना मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी दिल्या.

२) Sanction of staff as per new staffing pattern

याबाबत शासनाशी पाठपुरावा करण्यात यावा, अशा सूचना मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी दिल्या.

**मुद्दा क्र. १९ : आयुक्तांच्या वाहनावर लाल दिवा लावणेबाबत**

वाहनावर दिवा लावण्याबाबत शासनाने दिनांक ४.४.२०१४ रोजी अधिसूचना लागू केलेली असून त्यामध्ये राज्य माहिती आयुक्तांचा समावेश करण्यात आलेला नाही. राज्य माहिती आयुक्तांना मुख्य सचिवांचा दर्जा दिलेला असल्याने व आयुक्तांचे पद वैधानिक स्वरुपाचे असल्याने अधिसुचनेत बदल करणे आवश्यक असल्याचे श्री. ए.के. जैन, राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई व श्री. रविंद्र जाधव, राज्य माहिती आयुक्त, पुणे यांनी सांगितले. याबाबत मुख्यालयाकडून शासनास कळविण्यात यावे अशा सुचना राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी दिल्या.

**मुद्दा क्र. २० आयत्यावेळी येणारे विषय**

1. श्री. ए. के. जैन यांनी माहिती अधिनियमांतर्गत एकत्रित (Consolidated and Comprensive) नियम तयार करण्याची गरज असल्याचे सांगितले व २००५, २०१२ यावर्षी प्रसृत करण्यात आलेले नियम तसेच शासनाकडे द्वितीय अपिलाच्या पध्दतीबाबत पाठविण्यात आलेले नियम यांचा व इतर राज्यांनी तयार केलेल्या नियमांचा अभ्यास करुन एकत्रित नियम तयार करण्याची जबाबदारी श्री. कचरे, संचालक, माहिती अधिकार केंद्र, यशदा, पुणे यांच्यावर सोपविण्यात आली. यासंबंधीची आयोगाची पुढील बैठक यशदामध्येच घेण्याचे ठरले.
2. ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांचेकडे मोठ्या प्रमाणात माहिती मागविली जाते त्यावेळी त्या कार्यालयात सदर प्रतींच्या झेरॉक्स काढण्यासाठी पुरेसा निधी नसतो. त्यामुळे सार्वजनिक प्राधिकरणांस हा खर्च भागविण्यासाठी पीएलए अकाऊंट उघडणे आवश्यक असल्याने याबाबत शासनाने कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी श्री. मीना, अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांना सांगितले.
3. स्थायी अग्रिम सध्या मा. राज्य मुख्य माहिती यांच्या कार्यालयास प्रति महिना रुपये ५०००/- व राज्य माहिती आयुक्त यांच्या कार्यालयास रुपये २०००/- एवढे दिले जात असले तरी सदर अग्रीम अनुक्रमे १०,०००/- व रुपये ५,०००/- इतके वाढविण्यात यावे, असा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा अशी चर्चा झाली. त्यावर मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत सुचना दिल्या.

वरील मुद्यांवर चर्चा झाल्यानंतर उपस्थित मान्यवरांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.